## व्यक्तीपरिचय

# विमा महर्षी अण्णासाहेब चिरमुले - स्मृतीगंध



शिवछत्रपतींच्या वास्तव्याने पावन झालेले सातारा हे शहर सात दऱ्यांच्या डोंगर कुशीत वसले आहे. निसर्गाची मुक्त उधळण अनुभवणारे तसेच श्री. समर्थ रामदास स्वामी, परमपूज्य ब्रह्मेंद्र स्वामी, गोपालनाथ महाराज, श्रीधर स्वामी यांची असीम कृपा लाभलेले हे शहर स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांच्या हौतात्म्यामुळे संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. सातारच्या इतिहासाला राजघराण्याचा वारसा लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या घराण्याची ओजस्वी परंपरा इथे समृद्ध झाली. सातारच्या मातीचा सुगंध अनेक दिग्गज आणि मातब्बर मंडळींनी सर्वत्र दरवळत ठेवला. ही नगरी विमा महर्षी अण्णासाहेब चिरमुले यांची कर्तृत्वभूमी. अशा या पुण्यभूमीत वासुदेव गणेश तथा अण्णासाहेब चिरमुले यांचा जन्म ४ जून १८६४ रोजी झाला. त्यांच्या तेज:पुंज कर्तृत्वाने कालांतराने महाराष्ट्र दिपून गेला.

घरातील धार्मिक वातावरणात अण्णासाहेबांचे बालपण गेले. लहानपणापासूनच त्यांचा स्वभाव मृदुमुलायम होता. चांगल्या पुस्तकांचे वाचन करण्याची त्यांना आवड होती. नियमित अभ्यास त्याच बरोबर नियमित व्यायाम त्यांनी कधीच सोडला नाही. सन १८८१ साली प्रथम क्रमांकाने मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी कोल्हापूरला महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सन १८८४ मध्ये अर्थशास्त्र व इतिहास घेऊन ते बी.ए. झाले. सन १८९० मध्ये वकिलीची परीक्षा ते पास झाले. साताऱ्यात वकिली सुरू करण्याआधी मुधोळ संस्थानात १८९१ मध्ये ते न्यायाधीश म्हणून रुजू झाले. त्यांनी तीन वर्ष हे पद सांभाळले. त्यानंतर त्यांनी साताऱ्यांत १८९४ मध्ये वकिली सुरू केली.

साताऱ्यात आल्यावर त्यांच्या समाजसेवेच्या कार्याला खऱ्या अर्थाने गती मिळाली. त्यांच्या सामाजिक कार्यकर्तृत्वाचा स्वयंप्रकाशित व ठसठशीत पैलू म्हणजे वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनी. अण्णासाहेबांनी १९१३ मध्ये वयाच्या ४९व्या वर्षी या कंपनीची स्थापना केली. सन १९३५ साली सातारा येथे इन्शुरन्स कंपनीच्या नवीन वास्तूचा उद्घाटन समारंभ न्यायमूर्ती बाबासाहेब जयकर यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी त्यांनी असे गौरवपूर्ण उद्गार काढले की, ''आज येथे आल्याने मला एक अद्भूत व्यक्ती आणि संस्था यांचा परिचय झाला. ती व्यक्ती म्हणजे श्री. अण्णासाहेब चिरमुले व संस्था म्हणजे वेस्टर्न इंडिया विमा कंपनी''. या समारंभाचे वेळी प्रसिद्धी पराङ्मुख असलेले अण्णासाहेब मात्र अचानक कामासाठी मुंबईला निघून गेले होते.

विमा कंपनीकडे जमा होणारा विपुल पैसा इतरांच्या माध्यमातून गुंतविण्यापेक्षा तो व्यापार आणि उद्योगाकडे वळवता आल्यास जास्त फायदेशीर ठरेल असे विचारचक्र अण्णासाहेबांच्या मनात सुरू झाले. तथापि विमा व्यवसायाच्या कक्षेत व उद्देशात ते बसणारे नव्हते. म्हणून त्यांनी वयाच्या ७२व्या वर्षी म्हणजे १९३६ साली युनायटेड वेस्टर्न बँकेची स्थापना केली. बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी १९५१ पर्यंत म्हणजे वयाच्या ८८व्या वर्षापर्यंत अत्यंत समर्थपणे सांभाळली व बँक नावारुपास आणली. सन १९०७ मध्ये स्थापन केलेली सातारा स्वदेशी कमर्शियल बँक युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन करण्यात आली. विश्वस्त निधीचे आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी अण्णासाहेबांनी १९४६ मध्ये ''वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्युटर कंपनी'' स्थापना केली. या संस्थेचे ते १९५१ पर्यंत अध्यक्ष होते. त्यांनी स्थापना केलेली आणखी एक लोकोपयोगी संस्था म्हणजे विमा मुद्रक आणि प्रसारक लि. अत्यंत साधी रहाणी व उच्च विचारसरणी हे अण्णासाहेबांचे ब्रीद होते. कृतीवर त्यांचा अधिक भर होता. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे सौजन्याची मूर्तिमंत खाण. त्यांचे जीवन कार्य, आदर्श, प्रत्येक पिढीस सदैव प्रेरणादायी आहे. वानगी दाखल येथे दोन घटनांचा उल्लेख करतो. विमा कंपनीच्या एका मिटींगमध्ये अण्णासाहेबांना गाडी द्यावी असा ठराव एकमताने मंजूर झाला. तथापि अण्णासाहेबांनी गाडीचा प्रस्ताव नम्रपणे नाकारला. व्यक्तिगत स्वरुपाच्या पत्राचा टपाल खर्च संस्थेला नको म्हणून टपाल हशीलाचे पैसे खिशातून देणारे अण्णासाहेब म्हणजे पराकोटीचे आदर्श व्यक्तिमत्व. त्यांनी घालून दिलेली ध्येय धोरणे, उच्च नितीमूल्यांची परंपरा आपण विस्मृतीच्या पडद्यामागे जाऊ देता कामा नयेत. ऋषितुल्य विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**- श्री. स. ना. तथा बाळासाहेब भाटे**
**मो. ९४२२४०२६४९, सातारा.**


# VIDISHA
## ENTERPRISES

**Tally Partner**

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email** : meghanathakur@yahoo.com